विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांचे पुनर्वसन एक समाजशास्त्रीय संशोधन: संदर्भ यवतमाळ जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या
समाजिकषास्त्रे विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील
पीएचडी पदवीसाठी लघुशोध प्रबंधाचा आराखडा

संशोधिका

प्राची माणिकराव जहागीरदार

मार्गदर्शक

डॉ. बिभीषण करे

संषोधन मार्गदर्षक व विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

सन-2023

अ) प्रस्तावनाः

शेतीचा शोध हा शिकार व अन्न संकलनासाठी वणवण भटकण्यापेक्षा एका जागीच अन्न मिळवण्याचा मानवी इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आहे. एका परीने मानवाच्या स्थिर जीवनाची ती सुरवात होती. या षोधाचे मानवी जीवनावर सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अंगाने व्यापक परिणाम झालेले आपल्याला दिसून येतात.

शेतीचे उत्पत्तीस्थानः

जगात शेतीचा शोध साधारणतः 10,000 वर्षापूर्वी प्रथम मध्यपूर्वतील आत्ताचे इस्त्राईल, जार्डन, लेनबॉन, सिरीया, तुर्कस्थान, कुवेत, व इराक या लगतच्या प्रदेशांचा मिळून जो अर्धचंद्राकृती आकार होतो त्या सुपीक प्रदेशात लागला. अर्थात प्रत्यक्ष शेतीला सुरवात करण्याआधी माणूस (खरे तर स्त्रिया) त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातील वनस्पतींचे निरीक्षण करुन त्यातील खाद्ययोग्य अन्नाचे व विशेषतः बियाणांचे निरीक्षण करीत होता. पोषण मूल्य असलेली बियाणे राखून ठेऊन ती दुस-या वर्षीच्या हंगामात पेरता येऊ शकतात व एका बियाणाच्या पेरणीतून उगवलेल्या धान्यातून कापणी किंवा तोडणीनंतर कितीतरी जास्त बियाणे गोळा करता येतात. हे समजल्यावर शतीतील अन्ननिर्मितीतीचे तंत्रच त्याच्या हाती लागले. सुरवातीच्या काळात शेती तंत्र हे अतिशय प्राथमिक अवस्थेत होते. हातानेच शेतीची मषागत, पेरणी व इतर कामे व्हायची. पुढे गुरांच्या मदतीने शेती व्हायला लागली.

भारतीय शेतीसमोरील समस्याः

कृषी रसायनांच्या घातक परिणामांच्या बाबतीत आमच्या देशात जनता आणि शासन दोन्ही स्तरावर प्रचंड उदासिनता आहे. जगात अन्यत्र बंदी असलेली 66 कीटकनाषके आपल्या देषात वापरात आहेत. कृषी मंत्रालयाद्वारे केल्या गेलेल्या पाहणीत 12.5 टक्के नमुन्यांमध्ये मान्यता नसलेल्या कीटकनाशकांचे अंश आढळले. (सप्टे. 2015 मध्ये प्रकाशित अहवाल) याचा अर्थ देशात

कृषी रसायनांच्या वापराला आणि उत्पादनाला कायदा आणि नियमांचे बंधन नाही. एकीकडे संसदेत मागितले जाते की, कीटकनाशक अधिनियम 1968 नुसार सुरक्षितेचा विचार करूनच किटकनाशकांना मान्यता दिली जाते आणि दुसरीकडे मान्यता नसलेल्या किटकनाशकांना मान्यता दिली जाते आणि दुसरीकडे मान्यता नसलेल्या कीटकनाशकांचा देशात सर्रास वापर हातो. अशी रसायने राष्ट्रपती पासून ते ओपडपट्टीपर्यंत सर्वाच्या ताटात येतात.

या सर्व समस्यांचा विचार करता कृषिप्रधान देष म्हणवणा-या भारतातील शेतक-याला आत्महत्या करण्या शिवाय काहीच पर्याय उरलेला दिसत नाही. देशामध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-यांचा आकडा सुन्न करणारा आहे त्यात आघाडीवर आहे महाराष्ट्र. राज्यामध्ये गेल्या काही वर्षात 75 हजार शेतकरी कुटुंब प्रमुखांनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे शेतक-यांची घरे उध्वस्त होत आहेत. शेतीला पाणी नाही आणि पिकाला हमीभाव नाही. या दोन कारणांमुळे 95 टक्के शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. आर्थिक दृष्टीने सुबत्ता असणा-या महाराष्टात शेतक-यांच्या आत्महत्या हादरवून सोडणा-या आहेत. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येची टक्केवारी दरवर्षी वाढतच आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. गेल्या दहा वर्षामध्ये निर्माण झालेली दुष्काळाची परिस्थिती, दुष्काळाच्या परिस्थितीमुळे घटेलेले घटलेले शेतीचे उत्पादन तोटयात येणारा शेती व्यवसाय, शेतक-यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. जवाबदारी पार पाडण्यामध्ये अपयशी ठरत असलेला कुटुंबप्रमुख, या सर्व कारणामुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.

कृषी प्रधान देशामध्ये गेल्या वीस वर्षात तब्बल पाच लाख शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. त्यात महाराष्ट्र राज्य शेतक-यांच्या आत्महत्ते मध्ये आघाडीवर आहे. महाराष्टात 75,000 पेक्षा जास्त शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्येमध्ये 94 टक्के आत्महत्या या कुटुंब प्रमुखाच्या आहेत. झालेल्या आत्महत्येत 97 टक्के आत्महत्या पुरुषांच्या आहेत आणि सर्वात महत्वाची बाब म्हणजे 30 ते 59 या वयोगटातील शेतक-यांच्या आत्महत्या सर्वाधिक आहेत. शेतक-याने आत्महत्या केल्या नंतर त्यांच्या कुटंबाची अवस्था दयनीय बनते. घरातला कर्ता पुरुष एकाकी गेल्यामुळे कुटुंबा मधील बायको आणि मुले यांचे जीवन असाह्य बनते. पतीच्या

आत्महत्येनंतर मानसिक आघातात जगणारी महिला पतीवरील कर्जाची परतफेड, घर चालवण्यासाठी कामधंदा, मुलांचे शिक्षण, अशा वेगवेगळया जबाबदा-या त्या विधवेला पार पाडाव्या लागतात. त्यात मालमत्तेवरुन होणारे वा, सामाजिक प्रतिबंध समाजकंटकाचा त्रास हेही तिलाच सहन करावे लागते.

आ) संषोधन विषय निवड व महत्वः

मानवाच्या स्थिर जीवनाची सुरूवात ही शेतीपासून झालेली आहे. सुरवातीच्या काळात शेतकरी हा शेतातील धान्याच्या उपयोग पुाले पाहिजे म्हणून "यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांचे पुनर्वसन हा विषय मी निवडला आहे. पिडीत स्त्री अबला नसून सबला बनली पाहिजे, एकाकी झालेल्या पिडीत महिलेला तिच्या सासू सास-यांची, मुलांची जवाबदारी सांभाळण्यासाठी आधाराची अत्यंत गरज असते आशावेळेस तिचे पुनर्वसन होणे खूप महत्वाचे आहे म्हणून विधवा पुर्वासनाचा विषय अत्यंत महत्वाचा आहे.

इ) पूर्व संशोधन साहित्याचा आढावाः

डोंगरे भ.भ.-2016 यांनी जालना जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्यांचा समाज-शास्त्रीय दृष्टीकोन मांडला आहे. शेतक-यांच्या आत्महत्यासाठी शेतक-यांमधील कर्जबारीपणा, आजारपण, षेतक-यांचे कौटुबिंक प्रष्न दारिद्रय अथवा गरिबी सातत्याने येणारी नैसर्गिक संकटे व शेती खर्चातील वाढ, बियाणे, खते, औषधी यांचा काळा बाजार इत्यादी प्रमुख कारणे जबाबदार असल्याचे स्पष्ट होते.

कोतवाल अभिलाशाः विसाव्या षतकात औद्योगिक क्रांती नंतर कामगार शक्तीत महिलांचा वाढता सहभाग होता. तथापि, चांगल्या पगाराच्या नोक-या मिळवण्याकरिता स्त्रियांसाठी उच्च षिक्षणाची सोय नसणे ही त्यांच्यासाठी फार मोडी उडचण होती. कामगार दलित महिलांच्या वाढीव सहभागामुळे 20 व्या षतकामध्ये औद्योगिक भरभराट झाली. हे उल्लेखनीय योगदान

असूनही पुरुषांच्या तुलनते महिलांच्या कामगिरीकडे लक्ष वेधण्याचे उत्कृष्ट कार्य कोतवाल यांनी केले.

ऐतिहासिकदृष्टया भारतीय महिलांनी श्रमषक्तीला मोठ्या प्रमाणात हातभार लावला आहे. असे असूनही कामगार दलातील महिलांमध्ये ब-याच प्रमाणात भेदभाव केला जात आहे The monster salary index (2017) असे नमुद करते की भारतातील लिंगभाव अंतर 20% जास्त आहे. आणि हे अंतर वाढत असताना दिसून येते.

लिला दुबे: लिला दुबे यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन केवळ तिच्या स्वतःच्या जीवनातून नव्हे तर वेगवेगळया गटाच्या समाजाविषयक अभ्यासातून उद्भवला आहे. कारण त्यांच्यातील संबध आणि तुलना आणि परस्परसंबंधाना एक नवीन क्षितिजे प्रदान करतात. लीला दुबे यांचा स्त्रीवादी दुष्टीकोन स्त्रियांच्या अधीन असलेल्या परिस्थितीच्या असंख्य संशोधनास मदत करतो. महिलांच्या अस्तित्वाबद्दल जागरुकता, अपुरेपणा, आणि संकल्पना वगळण्याचे विष्लेषण देखील केले आहे. लीला दुबे यांचे कार्य समाजात महिलांचे प्रतिनिधित्व करण्याच्या भोवती फिरते. दुबे यांच्या नातेसंबधावरील कार्यामुळे सार्वत्रिकपणे स्वीकारल्या गेलेल्या पितृसत्ताक पध्दती आणि सिध्दांताबद्दल दृष्टीकोन अधोरेखित करतो.

बिना अग्रवाल: बिना अग्रवाल यांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडीत विषयांमध्ये सखोल अभ्यास आहे. त्यांनी कल्पकतेने वेगवेगळया पध्दती आणि अंतर्विद्याशाखीय दृष्टीकोन वापरुन जमीन उपजीविका आणि मालमत्तेचा हक्क, पर्यावरण आणि विकासः दारिद्य्र आणि असमानताः शेती आणि तांत्रिक बदल इत्यादींवर आपले मत मांडले आहे. त्यांनी विषेततः लिंग असमानता, सामाजिक बहिष्कार, मालमत्ता व विकास यांच्यातील संबंधानवर अभ्यास केला आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणात दक्षिण आशियातील देशामधील समस्यांवर काम केले आहे. बिना अग्रवाल यांनी शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावर देखील बरेच काम केलेले आढळते.

युवा वर्गाच्या स्थलांतरामुळे आज कृषि व्यवसायच मागे पडलेला आहे. त्यामुळे शेतीचा सगळा बोजा महिला वर्गावर येतो. परंतु कुटुंबप्रमुखाच्या स्थालांतारामुळे आणि महिलेच्या

नावावर शेती नसल्यामुळे महिलांना अनेक समस्योंना सामोरे जावे लागते. आजचा युवा वर्ग हा उद्योगधंद्यांसाठी शहरांकडे स्थलातरित होत आहे त्यामुळे ग्रामीण भागात राहणा-या महिलांवर शेतीचा बोजा पडतो. महिलांना घर सांभाळून शेती व्यवसाय करावा लागतो. त्यात त्यांना शेत नांगरणी करण्यापासून बियाणे खरेदी करणे, खत, फवारणीची औषधी आणणे, कापणी, मळणी करणे इत्यादी कामे करावी लागतात. परंतु हया कामासाठी त्यांना कोणताही मोबदला घर प्रमुखाकडून मिळत नाही. महिलांना हयासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. हयासारख्या अनेक कारणांमुळे महिलांचे पुनर्वसन होणे अत्यंत गरजेचे आहे. ही भिन्नता भरुन काढण्यासाठी मला ''आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा महिलांचे पुनर्वसन'' या विषयावर अभ्यास करावयाचा आहे.

ई) संशोधन पध्दत/ शास्त्र

'शास्त्र' या संकल्पनेला मराठीत 'विज्ञान' हाही पर्यायी शब्द आहे. शास्त्र या संकल्पनेत वास्तविकता, सत्यता, खरेपणा, तटस्थता, निःपक्षता सत्यपनशिलता या घटकांना महत्व असते माहिती किंवा ज्ञान निर्मितीचे एक शास्त्र म्हणूनही शास्त्र संकल्पनेचा उल्लेख केला जातो व्यापक, सर्वांगीण आणि तार्किक स्वरूपाच्या अध्यन प्रयत्नास शास्त्र ही संकल्पना लागू पडते.

1) रा.भ पाटणकर यांनी म्हटले आहे कि, कोणत्याही विषयाचा व्यवस्थित व तर्कषुध्द अभ्यासाला आपण शास्त्र असे म्हटले पाहिजे.

2) विंसेज आणि विंसेज, 'शास्त्र किंवा विज्ञान हा केवळ ज्ञानसंग्रह नसून ती एक पध्दती आहे.

3) डॉ.बिभीषण करे यांच्या मते, 'शास्त्र म्हणजे अषी पध्दती आहे कि, ज्याद्वारे प्राप्त तथ्यांना वस्तुनिष्टता, सत्यपणशीलता आणि निश्चितता प्राप्त करून देऊन घटनेच्या कार्यकारणभावाचे पध्दतशीर आणि अचूक विश्लेषण केलेले असते.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मिश्र संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात संख्यात्मक आणि गुणात्मक ह्या दोन्ही पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. मुलाखत पध्दत आणि प्रश्नावली या तंत्राचा उपयोग केला जाणार आहे.

विविध सामाजिकशास्त्रात सामाजिक घटकांचा आणि वास्तव परिस्थितीचा अभ्यास करावयाचा असेल, तर त्याकरिता संशोधन आराखड्याचे कार्य अत्यंत महत्वाचे मानले जाते. संशोधन आराखड्याशिवाय सत्य घटनांचा अभ्यास होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक संशोधन आराखड्याचा उपयोग महत्वपूर्ण साधन म्हणून केला जातो. मिश्र संशोधन पध्दतीचा उपयोग करून पिडीत महिलांच्या संपूर्ण परिस्थितीचा अभ्यास करून पुनर्वसनासाठी लागणारे उदिष्ट गाठता येईल. म्हणून हा आराखडा अत्यंत महत्वपूर्ण आहे.

कृषी व्यवस्थेचा अभ्यास सामाजिक शास्त्रात 1960 च्या दशकापासून सुरु झाला. (Agrarian Studies) उषा पटनायक, गौरांग शहा, आनंद चक्रवर्ती, चटोपाध्याय, आंद्रे बिताई, यांनी भारतातील कृषी व्यवसायातील स्त्रियांचे योगदान याकडे दुर्लक्ष केले. जागतिक स्तरावर सर्वप्रथम इस्टर बोजोप (Easter Boser Up) 1970 Role of women in economic development हे पुस्तक लिहून आर्थिक विकासाच्या सिध्दांताचे स्त्रीवादी विष्लेषण सुरु केले. पुढे बिना अग्रवाल, वंदना शिव, छाया दातार, पद्मिनी स्वामिनाथन आणि इतर सामाजिक अभ्यासकांनी कृशी व्यवसायातील स्त्रियांचे योगदान याचा स्त्रीवादी दृष्टीकोन अध्ययन सुरू केले. यातूनच पुढे Feminization of India ही संकल्पना सुरू केली.

प्रस्तुत संशोधनात आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा कशा पध्दतीने शेती व्ययवसाय करता आहेत एक विधवा स्त्री म्हणून शेतकरी महिला म्हणून किंवा समाजाचा नागरिक म्हणून कशा पध्दतीने संघर्ष करत आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न या अभ्यासात करण्यात येणार आहे.

1) विषय निवड

सद्यस्थितीत शेतक-यांच्या आत्महत्या प्रष्न अत्यंत जटील बनला आहे. 2001 पासून शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात खूप वाढ झाली आहे. शेतक-यांच्या आत्महत्येची निश्चित आकडेवारी सांगता येणे कठीण असलेक तरी या संदर्भातील विविध वृत्तपत्रातून, साप्ताहिकातून, मासिकांधून या समस्येचे तीव्र विश्लेषण झालेले आपल्याला पाहायला मिळते.

संशोधनाचे उदिष्ट लक्षात घेऊन आणि संषोधन प्रश्न यांना अनुसरुन आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा महिलांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने शेतकरी महिलांना आर्थिक, वैयक्तिक सांस्कृतिक, प्रषासकीय अडचणींचा शोध घेण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनासाठी मिश्र संशोधन आराखड्याची बांधणी करण्यात येईल. एक शेतकरी स्त्री, एक विधवा स्त्री म्हणून या समाज व्यवस्थेत विविध सामाजिक संस्था यांच्या सोबत कषा पध्दतीने सामाजिक व्यवहार करत आहेत ? समाज व्यवस्था यांच्याशी कशा पध्दतीने जुळवून घेत आहे याचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून अन्वेषण करण्यात येईल. कृषीव्यवस्थेचा अभ्यास सामाजिक शास्त्रात 1960 च्या दशकापासून सुरु झाला. (agrarian studies) उषा पटनायक, गौरांग शाहा आनंद चक्रवर्ती, चटोपाध्याय, आद्रे बिताई, यांनी भारतातील कृषीव्यवस्थेचा सामाजिक शास्त्राच्या दृष्टीकोनातून अभ्यास केला. परंतु पहिल्या पिढीतील सामाजिष्क शास्त्रज्ञांनी कृषी व्यवसायातील स्त्रियांचे योगदान याकडे दुर्लक्ष केले. जागतिक स्तरावर प्रथम इस्टर बोजोप (Ester Boseroup) 1970 Role of the women in economic development हे पुस्तक लिहून आर्थिक विकासाच्या सिध्दांताचे स्त्रीवादी विश्लेषण सुरु केले. पुढे बिना अग्रवाल, वंदना शिवा, छाया दातार, पद्मिनी स्वामिनाथन आणि इतर सामाजिक अभ्यासकांनी कृषी व्यवसायातील स्त्रियांचे योगदान योचा स्त्रीवादी दृष्टीकोन अध्ययन सुरु केले. यातूनच पुढे feminization of agriculture ही संकल्पना सुरु झाली.

प्रस्तुत संशोधनातून स्त्रीयांच्या पुनर्वसनाचा शोध घेण्यात येणार आहे.

2001 ते 2015 या 15 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्रात तब्बल 25740 शेतक-यांनी आत्महत्या केल्याचे वृत्त राज्याच्या महसूल विभागाच्या आकडेवारीतून समोर आले आहे. म्हणजेच दरवर्षी सरासरी आत्महत्याकरणा-या शेक-यांची संख्या 1716 इतकी होती (time of india.com) आणि सर्वात जास्त आत्महत्या 2010 ते 2015 या पाच वर्षात झाल्याचे निदश्रनास आले. आत्महत्याग्रस्त शेतक-याची संख्या ही जास्त मराठवाडा आणि विदर्भ प्रांतात जास्त आहे. विदर्भातील यवतमाळ जिल्हा हा आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या संख्येत अग्रगण्य आहे. यवतमाळ जिल्हयात 2001 ते 2015 या कालावधीत सुमारे 25470 शेतक-यांनी आत्महत्या केल्याची माहिती एका वृत्तपत्रात प्रकाशित झाली आहे. म्हणून प्रस्तू संषोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. "विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांचे पुनर्वसनः एक समाजशास्त्रीय संशोधन " प्रस्तुत संशोधनात मिश्र संशोधन पध्दती या तंत्राचा उपयोग करून यवतमाळ जिल्हयाची अध्ययनासाठी निवड करण्यात आली आहे तसेच प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या विधवा पत्नींचा अभ्यास करण्यात येणार आहे. यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा महिला हया पत्र आणि अपात्र या वर्गात मोडतात. प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्हयात एकूण सोळा तालूके आहेत त्यात यवतमाळ, वणी, मारेगाव, पांरी जामणी, आणि आर्णी या तालुक्यांचा समावेश आहे.

2) संशोधनाची उद्दिष्टये:

विधवांचे पुनर्वसन विषयक समस्या, महिला कुटुबांचे वास्ततिक आकलन होण्याच्या दृष्टीने संशोधन अध्यायनाच्या केंद्रबिदूकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी संषोधनाची उद्दिष्टये मांडण्यात आली आहेत.

1) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांचे कौटुबिक व सामाजिक जीवन अभ्यासणे.

2) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा महिलांच्या वैयक्तिक समस्या अभ्यासणे.

3) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा महिलांच्या आर्थिक समस्या अभ्यासणे.

4) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी निमशासकीय - शासकीय संस्थांचे योगदान अभ्यासणे.

5) विधवा महिलेच्या जीवनावर होणारा संस्कृतीचा परिणाम अभ्यासणे.

6) शिक्षित व अशिक्षित विधवा महिलांना येणा-या अडचणी अभ्यासणे.

7) महिलांना येणा-या आरोग्यविषयक समस्या अभ्यासणे.

3) गृहीतकृत्ये

1) विधवा महिलांना लिंगभेदानुसार दुय्यम स्थान दिले जाते, विधवा महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे परिणामी या महिला मागासलेल्या आहेत.

2) आपली पुरुषसत्ताक कुटुब पध्दती असल्यामुळे घरातील सर्व आर्थिक अधिकार पुरुषांकडे असतात त्यामुळे महिलांना आर्थिक व्यवहारात अडचण येते.

3) महिलांमध्ये षिक्षणाचा अभाव असल्यामुळे महिलांमध्ये सामाजिक जनजागृतीचा अभाव आढळून येतो.

4) महिला आरोग्यविषयक समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे महिलांमध्ये आरोग्यविषयक माहितीचा अभाव आहे.

5) विधवा महिलांना दारिद्रयामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, तसेच त्यांना आजही पारंपारिक पध्दतीने शेती करावी लागत असल्यामुळे त्यांच्यात नवीन तंत्रज्ञानाचा अभावा आहे.

6) अनेक महिलांमध्ये शासकीय योजना, सामाजिक कायदे, अंधश्रध्दा याबाबत अज्ञान आहे.

7) विधवा महिला अषिक्षित असल्यामुळे शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव आहे.

4) नमुना निवड पध्दती

संशोधनाचे निश्चित उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी योजनाबध्द संशोधन करण्यासाठी विश्वास तथ्यप्राप्तीसाठी संशोधन कार्यर सुसूत्रता निर्माण होण्यासाठी वेळ, श्रम पैशांच्या बचतीसाठी संशोधन आराखडा आवश्यक असतो. म्हणून आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पिडीत महिलांच्या समस्या, महिलांच्या आर्थिक, मानसिक, सामाजिक संदर्भात माहिती मिळवण्यासाठी अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी मिश्र संषोधन आराखडयाची बांधणी करण्यात येईल.

संशोधक संशोधन करताना माहितीच्या स्त्रोताचा जो एक लहान संच निश्चित करतो, त्यास नमुना निवड असे म्हणतात. नमुना निवड हे व्यक्ती अथव लोकसंख्या निवडीबाबतचे तंत्र आहे. संषोधन करत असताना विषय व्यापक असल्यामुळे सगळया घटकांचा किंवा लोकसंख्येचा समावेश संशोधन प्रकल्पात करता येत नाही. त्यामुळे नमुना निवड करुन संषोधित बहूसंख्य किंवा विषिष्ट घटकांचे योग्य प्रतिनिधत्व साकारले जाईल. या निकषावर नमुन्याची निवड केली जाते.

एक शेतकरी स्त्री, एक विधवा स्त्री म्हणून या समाज व्यवस्थेत विविध सामाजिक संस्था यांच्या सोबत कशा पध्दतीने सामाजिक व्यवहार करत आहेत ? पुरुषप्रधान संस्कृती, प्रशासकीय व्यवस्था, समाज व्यवस्था यांच्याशी कशा पध्दतीने जुळवून घेत आहेत. याचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून अन्वेषण करण्यात येईल. “विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या विधवांचे पुनर्वसनः एक समाज शास्त्रीय संशोधन.” प्रस्तुत संशोधनात समिश्र संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल. प्रस्तुत संशोधनात व्यष्टी अध्ययन या तंत्राचा उपयोग करून यवतमाळ

जिल्हयाची अध्ययनाकरिता निवड करत आहे. प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा पत्नींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

यवतमाळ जिल्हयातील एकूण आत्महत्याग्रस्त शेतक-यांची संख्या 25740 इतकी आहे. जिल्हयात एकूण 16 तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यातुन 15 घटक निवडले जातील, असे एकूण 240 घटकांचा अभ्यास करण्यात येईल. तसेच 20 विधवा महिलांचे व्यष्टी अध्ययन करण्यात येईल. यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवा महिला हया पात्र आणि अपात्र या वर्गात मोडतात. यवतमाळ जिल्हयातील पात्र आणि अपात्र महिलांचा आभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात जिल्हयातील पात्र आणि अपात्र विधवांची मुलाखत घेण्यात येईल.

या व्यतिरिक्त शेतकरी महिलांच्या शासकीय, वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक, शेती व्यतिरिक्त समस्या जाणून घेण्यासाठी 20 महिलांचा सखोल व्यष्टी अध्ययन करण्यात येईल. याव्यतिरिक्त शेतकरी महिलांच्या पुनर्वसनाच्या कार्य करणा-या निमशासकीय कर्मचारी यांच्याही सखोल मुलाखती घेण्यात येतील.

5) संशोधनाच्या मर्यादा

1) प्रस्तुत संशोधन हे यवतमाळ जिल्हयापुरते मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन हे यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या विधवांपुरतेच मर्यादित आहे.

3) प्रस्तुत संषोधन हे यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त पात्र/अपात्र शेतक-यांच्या विधवा महिलांपुरतेच मर्यादित आहे.

4) प्रस्तुत संशोधन हे विधवा महिलांच्या पुनर्वसानापुरतेच मर्यादित आहे.

6) सैध्दांतिक दृष्टीकोन

आत्महत्या या घटनेचे समाजषास्त्रीय दृष्टीकोनातून विष्लेषण करुन निष्कर्ष मांडण्याचे महत्वाचे कार्य प्रथमतः फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ईमाइल डरखाईम (1858 -1997) यांनी केले. आत्महत्या ही एक व्यक्तिगत घटना आहे. आत्महत्येच्या कारणांचा शोध वयक्तिक जीवनातील घटना, अनुभवव मानसिक स्थितीच्या अनुषंगाने घ्यावा तसेच वंशिक, अनुकरणात्मक, मानिसिक विकृती, निर्धनता, अनुवांशिकता, व हवामानातील बदल इत्यादी करण प्रतयक्ष – अप्रत्यक्षरित्या आत्महत्येस कारणीभूत ठरतात इत्यादी विचार डरखाईम नाकारून त्याने अनुभव प्रमाण्यवादी दृष्टीकोन सांख्यिकीय व तुलनात्मक पध्दतीने Le Suicide या ग्रंथात आत्महत्या सिंध्दाताची मांडणी केली

डरखाईम च्या मते, व्यक्तीने स्वतः केलेल्या ज्या ज्या सकारात्मक अथवा नकारात्क कृतीची परिणीती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या व्यक्तीच्या मृत्यूत घडून येते. असे सर्व मृत्यू म्हणजे आत्महत्या होय.

“ The term suicide is applied to all cases of death resulting directly or indirectly from a positive or negative act of the victim himself, which he know will produce this result.”

डरखाईमच्या मते आत्महत्या ही सकारात्क अथवा नकारात्मक कृतीतून घडून येत असते. फाशी, विषप्राशन, पाण्यात उडी घेऊन मृत्यू अशा कृतीला तर डरखाईम आत्महत्या मानतोच मात्र याशिवाय शत्रुच्या सैन्याबरोबर लढताना शहीद झालेला जवान, पतीच्या चितेवर उडी घेऊन जाणारी हिंदू स्त्री, समाधी घेणारा साधू, बुडत्या जहाजाचा कप्तान इत्यादी घटनाही डरखाईमच्या संज्ञेत आत्महत्या ठरतात.

7) संशोधनाचा प्रकार

प्रस्तुत संशोधनात संमिश्र संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येईल. (संख्यात्क व गुणात्क पध्दती). संशोधन समस्या आणि संशोधनाचे उद्देश समोर ठेऊन विधवा महिलांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने सामाजिक आणि शासकीय पातळीवर या योजना राबविण्यात आल्या त्यांचा परिणाम स्त्रियांचे पुनर्वसनात झाला का याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनात संख्यात्क माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधानाचे प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर करण्यात येईल. मुलाखत अनुसूचीमध्ये आत्महतयाग्रस्त शेतक-याच्या महिलांची वैयक्तिक, शैक्षणिक, सांस्कृतिक ही माहिती संकलित येईल. तसेच या मुलाखत अनुसूचीमध्ये स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी शासकीय आणि निमशासकीय संस्थांनी योजलेल्या योजनांचा आढावा घेण्यात येईल. तसेच मूलाखत अनुसूचीमध्ये या तंत्राशिवाय व्यक्तिगत पातळीवर शेतकरी स्त्रियांना स्त्री म्हणून कोणत्या वैयक्ति, प्रशासकीय, कृषीव्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया या पातळीवर व्यक्तिगत संघर्ष करावा लागतो. याचे अन्वेषण व्यष्टी अध्ययन या तंत्राच्या सहय्याने करण्यात येईल. याशिवाय काही अनुभवी महिला, निमशासकीय संस्थेचे कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषीअधिकारी, आरोग्य सेविका, माहिलांना सहाय्यता करणा-या सहकारी संस्था इत्यादींच्या सखोल मुलाखती घेण्यात येतील. याशिवाय शासकीय योजना, निमशासकीय संस्थेचे अहवाल आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांसाठी असणा-या योजना, परिपत्रके दस्ताऐवज या दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात येईल.

8) तथ्या संकलन – विश्लेषण

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम या दोन्ही स्त्रोतांचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात येईल. प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत अनुसूची, व्यष्टी अध्ययन, Case Study सखोल मुलाखती (in-depth Intervies) इत्यादी तंत्राच्या सहय्याने अध्ययन क्षेत्रातून निवडलेल्या उत्तरदात्याकडुन माहितीचे संकलन करण्यात येईल तसेच याशिवाय शासकीय आणि

निमशासकीय संस्थांकडून प्रकाशित /अप्रशासकीय मासिके, पत्रे, अहवाल इत्यादींचा दुय्यम स्त्रोत म्हणून वापर करण्यात येईल. संशोधनाचा मुख्य प्रश्न अनुसरून मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातून प्राप्त तथ्यांचे संगणक आधारित SPSS (Statistical Package for the Social Science) या संगणक अज्ञावलीच्या साहयाने तथ्यांचे विष्लेषण करण्यात येईल.

संख्यात्मक तथ्य विश्लेषणाच्या प्रक्रियेत सर्वप्रथम मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तथ्यांची छाननी करण्यात येईल. तसेच कोडबुक संकेतीकरण करण्यात येईल. त्यानंतर संगणकाच्या सहय्याने संशोधनाच्या उद्देशानुसार तथ्यांचे सादरीकरण व विविध स्वरुपात (सारणी, वर्तुळ, दंडकाकृती इ. आधारे करण्यात येईल. तसेच गुणात्मक तक्त्याच्या अनुषंगाने व्यष्टी अध्ययन, सखोल मुलाख्ती, क्षेतीय कार्याती मुलाखती इ तंत्राच्या सहाय्याने प्राप्त झालेल्या गुणात्मक साधानांचे विश्लेषण करत असताना शेतकरी महिलांचे व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शासकीय,प्रशासकीय, अनुभवांचे सविस्तर विश्लेषण करण्यात येईल. सखोल मुलाखतीच्या साहयाने प्राप्त झालेल्या तथ्यातून विविध माहितीचे सखोल विश्लेषण करून घेण्यात येईल.

9) प्रकरण विभागणी

1) प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्व लक्षात घेऊन संषोधनाची मांडणी पाच प्रकरणामध्ये केलेली आहे, ती पुढील प्रमाणे.

शेती व्यवसाय आणि शेतकरी हा समस्या प्रधान बनला आहे. सद्यस्थितीत कौटुंबिक खर्च व दैनंदिन उपजीविकेसाठी शेती व्यवसाय अनिष्चित बनल्यामुळे शेतक-यानमध्ये तणाव नैराश्य व संभ्रमवस्था निर्माण झाली आहे. परिणामी महाराष्ट्रात 41000 शेतक-यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले आहे. भारतातील एकूण शेतक-यांच्या आत्महत्येमध्ये हे प्रमाण 20.80 इतके आहे. भारतातील इतर राज्यापेक्षा विदर्भात शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वात जास्त

असल्याचे दिसून आले. शेतकरी आत्महत्या करतो पण त्याच्या मागे त्याची विधवा पत्नी एकाकी पडते. तिला आपल्या कुटुंबाचा सांभाळा करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, तिला अनेक सामाजिक, आर्थिक, समस्यांचा सामना करावा लागतो.

म्हणून विदर्भातील यवतमाळ जिल्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या विधवांचे पुनर्वसन हया विषयावर संशोधन होणे अत्यंत महत्वपूर्ण आहे.

2) प्रकरण दुसरे - पुर्व संशोधित साहित्याचा आढावा

संशोधन करण्यासाठी पुर्वसंशोधित साहित्याचा आढावा, त्या विषयावर झालेले संशोधन , प्रकाशित संदर्भ ग्रथ, दैनिक वृत्तपत्रातील लेख इत्यादींचा आढावा घेतला जाईल. प्रकरणाच्या दुस-या भागात संबधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल. संबधित साहित्यातून संशोधन पध्दती याचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण तिसरे - व्यष्टी अध्ययन

आत्महत्या शेतक-यांच्या विधवा महिलांचे व्यष्टी अध्ययनाद्वारे मुलाखत घेतली जाईल त्याद्वारे महिलांच्या सामाजिक, आर्थि, मानसिक अडचणींचा अभ्यास केला जाईल. त्याद्वारे महिलांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अभ्यास केला जाईल. प्रश्नावलीच्या सहयाने अडचणींचा सखोल अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण - अर्थनिर्वचन

विधवा महिलांना नव-याच्या मृत्यूमूळे येणा-या आर्थिक अडचणी, कौटुंबिक अडचणी, किंवा सरकारी योजनांची अपुरी माहिती, मुलांच्या पालनपोषणात येणा-या अडचणींचा विस्तृत अभ्यास केला जाईल.

विधवा महिलांना कोणकोणत्या सामाजिक संस्थांनी मदत केली, पतीच्या मृत्यू नंतर कागद पत्रे नावानी नसल्याने येणा-या अडचणींचा सखोल अभ्यास केला जाईल.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधानाचे निष्कर्ष सारांश आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा महिलंच्या पुनर्वसनासाठी प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षांच्या आधारावर काही उपाययोजना सुचवल्या जातील. त्यांचा आढावा या पकरणात घेतला जाईल.

संदर्भ सुची

देशमुख भालचंद्र 2011 शेतक-यांच्या आत्महत्या व कृषी विषयक अध्ययन, समाजशास्त्र विषयातील अप्रकाशित लघुषोध प्रबंध

फोले कविता भाऊराव, 2014 गोंड आदिवासींची सामाजिक संरचना: महिलांचा दर्जा व भूमिका (विषेष संदर्भ: किनवट तालुका)

डॉ. बिभीषण करे 2015 सामाजिक संशोधनाची मुलतत्वे. विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद

डोंगरे भ. भ. 2016 जालना जिल्हयातील शेतक-याच्या आत्महत्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन

डॉ. प्रदीप आगलावे, 2003 समाजशास्त्र परिचय, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

बामणे मारोती मोतीराय - सप्टें 2017 आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचा समाजशास्त्रीय अभ्यास - संदर्भ यवतमाळ जिल्हा

मैत्रेयी कृष्णराज, अरुणा कंची 2013 भारताच्या महिला शेतकरी, नॅषनल बुक टस्ट, इंडिया महाराष्ट्र राज्य ग्याझेटीअर नागपूर जिल्हा भाग- 1 2005 शासकीय लेखन समिती पृष्ठ 351

शिंदे विनायक-2011 मराठवाड्यातील शेतक-याचा आत्महत्या, कारण मीमांसा व उपाययोजना: एक समाजशास्त्रीय अध्ययन, अप्रकाशित शोधप्रबंध

संशोधिका

प्राची माणिकराव जहागिरदार

संशोधन मार्गदर्षक

डॉ. बिभीषण करे

समाजषास्त्र विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड